**नि.फौ.ख.क्र.१६९/२०२०**
**सरकार वि. प्रतिक**
**नि.क्र.३१**

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–अनिरूध्द प्रकाश झिटे
वय २५ वर्ष, व्यवसाय–सेल्समन
राह.सडेश्वर, तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

**१.** पोलिसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी समन्स पत्र नव्हते. साक्षीदार पुढे सांगतो की, पोलिस पाटलांनी दिले होते. पोलिसांनी मला पंचनामा कामी हजर राहण्यासाठी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीला **निशानी क्र.३२** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.३३** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला **आर्टीकल अ** देण्यात आले.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला दि.२०/१०/२०२० मौजा सडेश्वर येथे फिर्यादीच्या घरी पंचनामा करणेकामी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलिसांनी पंचनामा तयार केला होता व मला वाचुन दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष एक वेळूची काठी जिला पाच कडे व लांबी २ फुट ५ इंच जप्त केली होती व तसा जप्तीपंचनामा माझेसमक्ष तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.एस.बी.त्रीवेदी यांनी उलटतपास नाकारला.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि .२०.०१.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड